**राष्ट्रीय लोक अदालत दिनांक १४/०३/२०२६**

**दिवाणी व फौजदारी न्यायालय, कडेगांव**

(विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ केंद्रीय कायदा चे कलम १९ नुसार आयोजित)

निशाणी क्र. 17/B

**प्रकरण क्रमांक :-** रे.दि.मु.नं. २३४/२०२५

**वादीचे नांव :-** मनोहर कृष्णा आडके
रा. चिंचणी (अंबक), ता. कडेगांव, जि. सांगली

**प्र.वादींची नांवे :-** १) अनिकेत मनोहर आडके
२) विजया मनोहर आडके
नं. १ व २ रा. चिंचणी (अंबक), ता. कडेगांव, जि. सांगली
३) अपर्णा मनोहर आडके
विवाहानंतर अपर्णा गणेश नष्टे
रा. स्वामी समर्थ नगर, सोलापूर, ता. सोलापूर, जि. सोलापूर

**प्रकरण क्रमांक :-** रे.दि.मु.नं. २३४/२०२५

**न्यायालयाचे नांव :-** मा.श्री. अविनाश रमाकांत माळवदे
दिवाणी न्यायाधीशसो. व. स्तर, विटा

**पॅनल**

१) न्यायिक अधिकारी यांचे नांव व पदनाम - मा.श्री. ए.आर. माळवदे
दिवाणी न्यायाधीशसो. व. स्तर, विटा

२) पॅनल सदस्य - ॲड्. एम्.एम्. चव्हाण

**निवाडा**

दोन्ही पक्षांमधील वाद सामंजस्याने मिटविण्यासाठी प्रस्तुतचे प्रकरण हे आजरोजी राष्ट्रीय लोक अदालत समोर सादर करण्यात आले आहे. उभय पक्षकारांनी

या लोक अदालतसमक्ष तडजोड केली आहे आणि त्यांच्या तडजोडीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

वादींनी सदरचा दावा डिक्लेरेशन आणि निरंतर ताकिदीबाबत, वगैरेकरिता दाखल केलेला आहे. सदरील दाव्याचे कामी यातील वादी व प्र.वादी यांचे दरम्यान बोलाचाली होऊन उभयतांचे दरम्यान आपसांत तडजोड झालेली आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

१) वादीचा दावा प्र.वादींना मान्य आहे व कबूल आहे.

२) दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही वादी यांनी त्यांचे नोकरीचे स्वकष्टाचे उत्पन्नातून दि. २९/१२/१९९५ रोजी खरेदी केलेली होती व आहे. सदर दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वादी यांचीच खरेदी तारखेपासून, म्हणजे दि. २९/१२/१९९५ पासून खरेदी मालकी हक्काची प्रत्यक्ष कबजे वहिवाट होती व आहे हे प्र.वादी यांना मान्य आहे व कबूल आहे.

३) सदर दाव्यातील प्र.वादी नं. १ हे दि. २९/१२/१९९५ रोजी अज्ञान होते. त्यावेळी प्र.वादी नं. १ यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नव्हते. सदर दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेली जमीन खरेदी करताना प्र.वादी नं. १ ते ३ यांनी वादी यांना तसेच सदर दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेली जमीन ज्याच्या-कडून खरेदी केली त्यांना खरेदी मोबदल्यापैकी कांहीही रक्कम दिलेली नव्हती व नाही. सदर दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीमध्ये प्र.वादी नं. १ ते ३ यांचा कोणताही हक्क, अधिकार, कबजा नव्हता व नाही हे प्र.वादी यांना मान्य आहे व कबूल आहे.

४) सदर दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेली जमीन वादी यांनी त्यांचे नोकरीचे स्वकष्टाचे उत्पन्नातून दि. २९/१२/१९९५ रोजी रजि. खुषखरेदीपत्राने प्र.वादी नं. १ हे अज्ञान असताना प्र.वादी नं. १ यांचे नांवे खरेदी केलेली होती, परंतु

सदर खरेदीपत्रातील मोबदल्याची पूर्ण रक्कम ही वादी यांनीच दिलेली असलेने वादी हे दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे दिनांक २९/१२/१९९५ रोजीचे रजि. खुषखरेदीपत्राने पूर्ण मालक झालेले होते व आहेत हे प्र.वादी यांना मान्य आहे व कबूल आहे.

५) सदर दि. २९/१२/१९९५ रोजीचे खरेदीपत्राची नोंद दावा मिळकतीचे ७/१२ सदरी फे.नं. ७१७३ ने प्र.वादी नं. १ यांचे अ.पा.क. म्हणून वादी यांचे नांवाने झालेली होती व आहे.

६) सदर दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे ७/१२ सदरी प्र.वादी नं. १ यांचे नांव हे पोकळ असून सदर दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे वादी हेच पूर्ण मालक आहेत हे प्र.वादी यांना मान्य आहे व कबूल आहे.

७) सदर दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे ७/१२ उताऱ्यावरून प्र.वादी नं. १ यांचे नांव कमी करणेस प्र.वादी यांची कोणतीही हरकत नाही.

८) सदर तडजोडीप्रमाणे वादी यांनी दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे ७/१२ उताऱ्यावरील प्र.वादी नं. १ यांचे नांव कमी करून वादी यांचे नांवाची नोंद करून घेणेची आहे हे प्र.वादी यांना मान्य आहे व कबूल आहे.

९) सदर दावा कलम १(अ) व १(ब) मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकती-बाबत वादी व प्र.वादी यांचेमध्ये कांही तक्रार उद्भवलेस सदरची तक्रार या तडजोडीने दूर करून घेणेची आहे.

१०) सदरची तडजोड वादी व प्र.वादी यांचेवर बंधनकारक आहे.

येणेप्रमाणे वादी व प्र.वादी यांचेमध्ये तडजोड असे.

(मागे पहावे)

पक्षकारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी कोर्ट फी (भरली असल्यास) कायद्याप्रमाणे व नियमाप्रमाणे त्यांना परत करण्यात येईल.

वादी
मनोहर कृष्णा आडके

प्र.वादी नं. १ तर्फे मुखत्यार
अनिकेत मनोहर आडके

प्र.वादी नं. २
विजया मनोहर आडके
(स्वतः करीता व प्र.वादी नं.१ करीता कुलमुखत्यार).

प्र.वादी नं. ३
अपर्णा मनोहर आडके
विवाहानंतर अपर्णा गणेश नष्टे

वादींतर्फे ॲड्.
(ॲड्. के.बी. यादव)

प्र.वादींतर्फे ॲड्.
(ॲड्. अमृता रमेश जाधव)

**समोर**

मा.श्री. ए.आर. माळवदे
दिवाणी न्यायाधीशसाो. व. स्तर, विटा
न्यायिक अधिकारी
पॅनल प्रमुख

ॲड्. एम्.एम्. चव्हाण
पॅनल सदस्य

दिनांक : १४/०३/२०२६